# प्रेस नोट

दिनांक २९/०१/२०२१

**प्रभाग समिती – डी, अचोळे, नालासोपारा, वसई – विरार महानगरपालिका, जि. पालघर येथील लिपीक यांस लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
| गुन्हा नोंद क्रमांक | तुळींज पोलीस स्टेशन, जि. पालघर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध (संशोधन २०१८) अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **नंदकुमार कमलाकर कोळी, वय ४३ वर्षे, लिपीक, वर्ग ३, प्रभाग समिती कार्यालय डी, अचोले, नालासोपारा, वसई विरार महानगरपालिका जि. पालघर.** |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ३५,०००/–रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/–रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार हे ओम साई राम निवास चाळ सोसायटीचे अध्यक्ष असून ओम साई राम निवास चाळ सोसायटी मध्ये १७ रुम असून त्यामधील ७ रुमला घरपट्टी लावण्यासाठी प्रभाग समिती डी, आचोळे, नालासोपारा येथे दि. ०१/१२/२०२० रोजी अर्ज दिला होता. तक्रारदार श्री. सचिंद्र मुक्तेश्वर पांडेय यांनी दि. २८/०१/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. २९/०१/२०२१ रोजी पडताळणी कारवाई वेळी लोकसेवक कोळी यांनी प्रत्येकी रुमसाठी ५,०००/– रुपये प्रमाणे ३५,०००/– रुपये लाचेची मागणी केली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. २९/०१/२०२१ रोजी पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने अेसीबी, ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक नंदकुमार कमलाकर कोळी यांना तक्रारदार यांचेकडून १५,०००/– रुपयांची लाच स्विकारताना विनायका हॉस्पिटलच्या बाजूच्या रस्त्यावर, आचोळे येथे रंगेहात पकडण्यात आले. |
| | |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**

संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री नं :– १०६४

दुरध्वनी क्र. :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉटस् ॲप क्र. :– ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक अँटी करप्शन ब्यूरो, ठाणे

( संतोष शेवाळे )
पोलीस निरीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे